

KOLHAPUR

"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार"
-शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था संचालित

## विवेकानंद कॉलेज, (स्वायत्त) कोल्हापूर,

## समाजशास्त्र विभाग

## शैक्षणिक वर्ष 2018 - 19

दि. 08/10/2018

# नोटीस

समाजशास्त्र विभागातील बी. ए. भाग 1 च्या सर्व विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते कि, शैक्षणिक वर्ष 2018 - 19 च्या पहिल्या सत्राच्या अंतर्गत मूल्यमापनासाठी आवश्यक असणारे होम असाइनमेंट दिनांक 15/10/2018 पर्यंत समाजशास्त्र विभागात जमा करावेत.

एच. व्ही. चामे

**HEAD**
**DEPARTMENT OF SOCIOLOGY**
**VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR**
**(AUTONOMOUS)**

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous)
ESTD JUNE 1964

11

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha's

# VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR (AUTONOMOUS)

KOLHAPUR

## Internal Assessment Sheet - MARCH-APRIL 2019

Academic Year : 2018-2019

Class : B.A. SEM 2

Paper Code : ____________

Subject : SOCIOLOGY -II

Name of Asst./Asso. Prof. : mr chame. H.V. mr. maske. V.N.

Section : ---

Sign. of Asst./Asso. Prof. : mr. chavan. R.P

| Sr. No. | Roll No | Seat No. | Class Test (__ marks) A | Assignment/Attendance (__ Marks) B | Total (__ Marks) A+B | Remarks | Seat No. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 4502 | B4502 | 03 | 04 | 07 | | B4502 |
| 2 | 4505 | B4505 | 04 | 05 | 09 | | B4505 |
| 3 | 4507 | B4507 | 05 | 05 | 10 | | B4507 |
| 4 | 4508 | B4508 | 05 | 05 | 10 | | B4508 |
| 5 | 4513 | B4513 | 05 | 04 | 09 | | B4513 |
| 6 | 4515 | B4515 | 05 | 05 | 10 | | B4515 |
| 7 | 4522 | B4522 | 03 | 04 | 07 | | B4522 |
| 8 | 4527 | B4527 | 05 | 05 | 10 | | B4527 |
| 9 | 4530 | B4530 | Ab | Ab | — | | B4530 |
| 10 | 4532 | B4532 | 04 | 04 | 08 | | B4532 |
| 11 | 4534 | B4534 | 05 | 05 | 10 | | B4534 |
| 12 | 4535 | B4535 | 02 | 04 | 06 | | B4535 |
| 13 | 4536 | B4536 | 04 | 05 | 09 | | B4536 |
| 14 | 4540 | B4540 | 04 | 05 | 09 | | B4540 |
| 15 | 4541 | B4541 | 05 | 04 | 09 | | B4541 |
| 16 | 4542 | B4542 | 03 | 04 | 07 | | B4542 |
| 17 | 4549 | B4549 | 05 | 05 | 10 | | B4549 |
| 18 | 4550 | B4550 | Ab | Ab | — | | B4550 |
| 19 | 4554 | B4554 | 04 | 05 | 09 | | B4554 |
| 20 | 4556 | B4556 | 05 | 05 | 10 | | B4556 |
| 21 | 4557 | B4557 | 05 | 05 | 10 | * | B4557 NI |
| 22 | 4563 | B4563 | 05 | 04 | 09 | | B4563 |
| 23 | 4564 | B4564 | 04 | 05 | 09 | | B4564 |
| 24 | 4565 | B4565 | 05 | 05 | 10 | | B4565 |
| 25 | 4566 | B4566 | 05 | 05 | 10 | | B4566 |

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

Date : 14/3/2019

" ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार "
- शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

Signature of Supervisor

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha's
# VIVEKANAND COLLEGE (Autonomous), KOLHAPUR

Class B.A-I Div. Roll No. 4549

Suppliment No. Subject समाजशास्त्र

Test / Tutorial No.

Name :- VAISHNAVI DHANGAR.

Q 1 संस्कृतीचा अर्थ सांगून संस्कृतीचे वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

1) संस्कृती ही एक संकीर्ण म्हणजेच गुंतागुंतीची बाब असून तीन अनेक गोष्टींचा समावेश होतो.

२) संस्कृतीचा मानवनिर्मित भौतिक आणि अभौतिक अशा दोन्ही घटकांचा समावेश होतो. उदा:- कौशल्ये, श्रद्धा, ज्ञान, नीतिकल्पना या अभौतिक बाबी होत. तर मानवाने निर्माण केलेल्या घरे, दागिने, कपडे, इमारती, यंत्रे, अवजारे, या भौतिक किंवा डोळ्याने दिसणाऱ्या बाबी आहेत. संस्कृती ही या दोन्ही घटकांची मिळून बनलेली संकीर्ण समग्रता आहे.

3) संस्कृतीतील विविध गोष्टी व्यक्ती समाजाचा सभासद या नात्याने शिकून घेते.

4) संस्कृती ही समूहविशिष्ट किंवा समाजविशिष्ट तसेच कालविशिष्ट बाब आहे. म्हणजेच प्रत्येक समुहाची / समाजाची विशिष्ट अशी संस्कृती असते आणि ती कायमस्वरूपी स्थिर राहणारी बाब नसून कालौघात बदलत जाते.

5) विशिष्ट समूहातील किंवा समाजातील सर्वासाठी व बहुसंख्य सदस्यांसाठी त्या समूहाची वा समाजाची संस्कृती समान असते. म्हणजेच संस्कृतित सर्वांचा सहभाग असतो.

6) संस्कृती म्हणजे विशिष्ट समाजाची विशिष्ट कालखंडातील जीवनरीत (Long of life होय)

7) एक पिढी आपली संस्कृती दुसऱ्या पिढीकडे संक्रमित करीत असतो. संस्कृती ही निसर्गदत्त बाब नाही.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

* संस्कृतीची वैशिष्ट्ये :
संस्कृती ही सकीर्ण बाब असून तिचे स्वरूप अधिक स्पष्ट होण्यासाठी संस्कृतीच्या वैशिष्ट्यांचे वर्णन खालीलप्रमाणे :

(1) संस्कृती अमूर्त असते :
संस्कृती ही अमुर्त घटकांनी युक्त असते. या अमूर्त घटकांत प्रथा, परंपरा, कायदा, संकेत, विश्वास, ज्ञानासारख्या घटकांचा समावेश होतो. हे घटक अमूर्त व अस्पर्श असतात. मात्र त्यांचे मनोमन आकलन होते. या विषेशांचा प्रवर्तक एडवर्ड टायलर आहे. त्याने वस्तुरूप निर्मितीचा संस्कृतीत समावेश केलेला नाही. एकूण संस्कृती अमूर्त अशा घटकांनी युक्त असते.

(2) संस्कृती हस्तांतरण करण्यात येते :
संस्कृतीत संस्कृतीचे संक्रमण करण्यात येते. हे संक्रमण एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे म्हणजे संस्कृती हस्तांतरित होत आली आहे. संस्कृती संक्रमणाचे कार्य संकेत व भाषेच्या माध्यमातून होते. इंग्रजी भाषेच्या माध्यमातून स्वातंत्र्य, समता, बंधुता, समान न्याय या मूल्यांच्या भारतीयांनी स्वीकार केलेल्या आहे. एक प्रकारे हे ज्ञान सामाजिक आणि राजकीय मूल्यांचे संक्रमण मानले पाहिजे. संस्कृती संक्रमण प्रक्रिया निरंतर चालतेली असते. अर्थात, त्यासाठी त्या दोन्ही समूह किंवा समाजात संपर्काची गरज असते. मग तो संपर्क प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष असू शकेल.

(3) संस्कृती संचयशील असते :
मानव पाठीमागच्या पिढीकडून संस्कृती आत्मसात करतो व पुढच्या पिढीकडे ती हस्तांतरित करतो. पण हे हस्तांतर होत असताना संस्कृतीचे स्वरूप जसेच्या तसे असते असे नाही. यातील काही गोष्टी टाकल्या जातात. तर नव्या गोष्टींचा आत अंतर्भाव होतो. वर्तमानकाळातील पिढी संस्कृतीत नव्या ज्ञानाची, अनुभवाची, उपकरणांची, साधनांची, कला आणि तंत्रज्ञानाची भर घालते. उदा. विज्ञानशास्त्रीय पाठीमागच्या पिढीकडून संक्रमित झालेल्या ज्ञानात नव्या पिढीत कितीतरी भर पडली आहे.

ESTD JUNE 1964 KOLHAPUR

याचप्रमाणे संस्कृतीच्या सर्वच क्षेत्रांत घडून येते. संस्कृती अशा प्रकारे संचयशील असल्याने ती दिवसेंदिवस अधिक समृद्ध होत जाते.

(4) संस्कृती म्हणजे शिक्षित व्यवहार :

संस्कृती जैविक नियमाप्रमाणे आनुवांशिक घटकासारखी पुढच्या पिढीकडे संक्रमित करण्यात येत नाही जन्मतः बालकास संस्कृतीचा परिचय नसतो. तो एक हाडामासांचा गोळा असतो. याकडून बालक संस्कृतीतील घटकांना आत्मसात करतो. संस्कृती शिकण्याची प्रक्रिया जाणीवपूर्वक आणि अजाणता चाललेली असते. ती प्रत्यक्ष - अप्रत्यक्ष रितीने सांस्कृतिक व्यवहार शिकल्याशिवाय कोणताही सांस्कृतिक वारसा आपणास मिळत नाही.

(5) प्रत्येक समाजाची संस्कृती वेगळी असते :

सर्व मानवी समाजाची संस्कृती हे अद्वितीय लक्षण असते तरी सर्व समाजाची संस्कृती एकसारखी नसते किंवा एका संस्कृतीचे प्रतिबिंब म्हणून दुसरी संस्कृती कधीच आढळत नाही. इतकेच कशाला एका प्रदेशात राहणाऱ्या विभिन्न समुदायांची संस्कृती वेगवेगळी असते हे होय. भारतीय संस्कृतीपेक्षा चिनी संस्कृती किंवा अमेरिकेतील संस्कृती वेगवेगळी दिसून येते. या संस्कृतीतील ज्ञान, विश्वास, संकेत, मूल्य व प्रमाणकांत आपणास भिन्नता आढळते.

(6) संस्कृती बदलत जाते :-

कोणत्याही समाजाची संस्कृती पूर्णपणे स्थिर असत नाही. प्रत्येक समाजाच्या दृष्टीने आदर्श जीवनरीतच असते. विशिष्ट समाजात जीवन जगलेल्या अनेक पिढ्यांचा सामूहिक वारसा प्रत्येक पिढीला लाभत असतो. हजारो वर्षांचा इतिहास संस्कृतीला असतो. त्यामुळेच मागच्या पिढ्यांनी अवलंबलेला जीवमार्ग हा आपोआपच नव्या पिढीच्या दृष्टीनेदेखील 'आदर्श' जीवन-मार्गच असतो. शिवाय आपली संस्कृती हीच श्रेष्ठ संस्कृती आहे. आपल्या चालीरिती, श्रद्धा, मूल्ये या गोष्टीच इतरांहून योग्य व आदर्शच आहेत. अशाच संस्कार नव्या पिढीवर बालपणापासूनच सातत्याने घडवून आणले जातात. दुसऱ्या शब्दांत आपली संस्कृती आदर्श आहे याच स्वरूपात

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

ती शिकविली जाते असल्याने आदर्श जीवनमार्ग याच स्वरूपात तिचा स्वीकारही नव्या समाज सदस्याकडून होतो. अगदी साधे उदाहरण म्हणजे आदिवासी समाजही स्वतःची संस्कृती हीच आदर्श संस्कृती आहे असे मानित असतात. अशा प्रकारे समाजाला आपली संस्कृती हा जीवन जगण्याचा एक आदर्श मार्ग वाटतो. उदा; भारतीयांनाही भारतीय संस्कृती ही जगातील एक आदर्श संस्कृती आहे असे वाटते.

(५) भाषा संस्कृतीचे एक मूलभूत वैशिष्ट्य:

भाषा हे कोणत्याही संस्कृतीचे एक मूलभूत वैशिष्ट्य होय. भाषेतील शब्द ही प्रतिके असतात व माणसाला अमूर्त पातळीवर विचार करता येणे भाषेमुळेच शक्य होते. भाषेवर संस्कृतीचा विकास अवलंबून असतो. भाषेच्या माध्यमातूनच एक पिढी दुसऱ्या पिढीकडे संस्कृती संक्रमित करतो. म्हणजे भाषा हे कोणत्याही संस्कृतीच्या निर्मितीचे हस्तांतरणाचे व विकासाचे एक प्रमुख साधन आहे.

(८) संस्कृती ही एकात्मता निर्माण करणारी यंत्रणा होय:

समाजाची संस्कृती ही त्या-त्या समाजाला एकात्म व एकसंध ठेवण्याचे कार्य करणारी यंत्रणा होय. संस्कृती त्यात्या समाजातील बहुतांश व्यक्तींना समान असते किंवा संस्कृतीत सर्वांचा समान सहभाग असतो. त्यामुळे समाजातील सर्व व्यक्तींना एकत्रित ठेवण्यात संस्कृतीचा कार्यभाग महत्त्वाचा आहे.

(९) संस्कृती हा समाजाचा आदर्श होय:

प्रत्येक समाजाची संस्कृती ही त्या-त्या समाजाच्या दृष्टीने आदर्श जीवनरीत असते. विशिष्ट समाजात जीवन जगलेल्या अनेक पिढ्यांचा सामुहिक वारसा प्रत्येक पिढीला लाभत असतो. हजारो वर्षांचा इतिहास संस्कृतीला असतो. त्यामुळेच मागच्या पिढ्यांनी अवलंबिलेला जीवनमार्ग हा आपोआपच नव्या पिढीच्या दृष्टिकोनातील 'आदर्श' जीवनमार्गच असतो.

(१०) संस्कृतीचे संप्रादन होते किंवा ती शिकून घेतली जाते:

संस्कृती हा माणसाचा जन्मजात गुणधर्म नाही. ती माणसाला आपोआप प्राप्त होत नाही. ती शिकून घ्यावी लागते. मानवेतर प्राणिजाती आणि मनुष्यप्राणी या दोहात काही भेद आहेत. बहुतांशी मानेवर प्राण्यांचे बहुतेक वर्तन हे सहजप्रवृत्तीमधे

10/10